**नियमित दिवाणी दावा क्र. १८६/२०२३ मधील नि.क्र. २१ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करुन दाव्यात हजर होण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, वादी यांनी सदरचा दावा सरस निरस मानाने तुटक वाटप होवून स्वतंत्र कब्जा व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ यांना दाव्याची नोटीस दि. १६.०२.२०२४ रोजी लागू झाली होती. दि. १३.०१.२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी दाखल केला आहे. सदर प्रतिवादी हे वयस्कर असून त्यांना कायदयाचे ज्ञान नाही. सदरकामी प्रतिवादी क्र. २ यांचेविरुध्द दाव्याकामी वेळेत हजर न झाल्याने दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश झालेला आहे. सदर प्रतिवादी यांचा दावा मिळकतीत असलेला हक्क व सदर दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. २ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद होणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जातील नमूद कारण मान्य व कबुल नाही. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निष्कर्षापर्यंत आल्यास प्रतिवादी क्र. २ यांच्यावर जास्तीत जास्त खर्चाची रक्कम आकारुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, प्रतिज्ञापत्र व म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत दावा वादी यांनी सरस निरस मानाने तुटक वाटप होवून स्वतंत्र कब्जा, निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल

होण्यासाठी प्रतिवादी क्र. २ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद करणेही आवश्यक आहे. असे असले तरी प्रतिवादी क्र. २ हे मुदतीत दाव्यात हजर न झाल्याने प्रस्तुत दाव्याच्या कामकाजास विलंब झालेला आहे. उपरोक्त प्रतिवादींडून झालेला विलंब लक्षात घेता वादी यांना खर्चाची रक्क्म रुपये ७००/– प्रतिवादी क्र.२ यांनी देणे न्यायोचित आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम रुपये ७००/– वादी यांना देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद करण्यात येत आहे.

KADAM NUTAN SACHIN

Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2025.07.16 07:16:36 +0530

स्थळ–कवठेमहांकाळ (श्रीमती एन.एस.कदम )

दिनांक १४.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -14.07.2025
Order signed by the
Presiding Officer on -14.07.2025
Order uploaded on -16.07.2025